# जनसंपर्क अधिकारी
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pr&o.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३७ -२३** **दिनांक ०२/०२/२०२३**

## वेश्या व्यवसाय करणा-या महिला आरोपीस अटक करुन २ पिडित मुलींची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दि.०१.०२.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रिया गायकवाड सध्या रा. भाडयाची रुम, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड, पूर्व हि वेश्याव्यवसाय करीत असून तिच्या मो. क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, ती पुरुष गिऱ्हाईकाशी बोलणी करुन तिचा व्हॉटसअॅप मोबाईल क्रमांकावरुन व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन मिरा- भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास सांगुन वेश्यागमनाचा मोबदला घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पो.नि. श्री. समीर अहिरराव, पोलीस निरिक्षक, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वेश्यादलाल महिला आरोपी रिया गायकवाड हिने बोगस गिऱ्हाईकास दिल्ली दरबार हॉटेल, काशिमीरा या ठिकाणी बोलावून वेश्यागमनाकरीता ०२ मुलींना रेस्टॉरन्टमध्ये घेवून गेली असता, पंचासमक्ष बोगस गिऱ्हाईकास मुलींना दाखवुन त्या बदल्यात एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन ठरलेली रक्कम स्विकारल्याने महिला पोलीसांच्या मदतीने सापळा कारवाई करुन १६.५० वा. ताब्यात घेवुन व तिचा साथीदार पाहिजे आरोपी तम्बी रा. मालाड पूर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी पिडीत मुलींना पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन पाठविले असल्याचे निष्पन्न झाल्याने महिला वेश्यादलाल रिया गायकवाड हिस सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन २ पिडित मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वर नमुद आरोपींविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I ८५/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७०,३४ सह अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, चा.पो.हवा. गावडे, म.पो.अंम. अश्विनी भिलारे सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----